रयत शिक्षण संस्थेचे,

अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स व
हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज, मंचर जि. पुणे

## नोटीस शिष्यवृत्ती विभाग

२०२५-२६

## केंद्रशासन पुरस्कृत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती नोटीस

दि.०४/०८/२०२४

महाविद्यालयातील सिनियर विभागातील **व्दितीय व तृतीय वर्षासाठी बी.ए/बी.कॉम./ बी.एस्सी** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतलेल्या विदयार्थ्यांना कळविण्यात येते की, केंद्रशासन पुरस्कृत सेंट्रलसेक्टर शिष्यवृत्तीसाठी शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अर्ज मागविलेले आहेत. तसेच गत वर्षी बी.ए., बी.कॉम.,बी.बी.ए.(सी.ए.) व बी.एस्सी भाग १ व २ मधील ज्या विद्यार्थ्यांना गत वर्षी सन २०२४-२५ मध्ये सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. त्यांनीही यावर्षी Renewal ऑनलाईन अर्ज करावयाचे आहेत. अशा विद्यार्थ्यांनी www.scholarship.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन अर्ज भरुन खालील प्रमाणेकागदपत्रे जोडून भरलेला अर्ज महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागाकडे जमा करावा. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी अंतिम **दि. ३१/१०/२०२५** ही आहे. भरलेला अर्ज वेळेत जमा न केल्यास त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

- **सेंट्रलसेक्टर शिष्यवृत्ती अर्जाकरिताखालील प्रमाणेकागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

➢ डोमेसाईल सर्टिफिकेट (अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा)

➢ अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.

➢ अर्जदार/त्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु ४.५ लाखापेक्षा अधिक नसावे.

➢ मागील वर्षाचे गुणपत्रक झेरॉक्स

➢ अर्जदार मागास प्रवर्गातील असल्यास जात प्रमाणपत्र झेरॉक्स

➢ विद्यार्थ्यांचे स्वत:चे बँक पासबुक झेरॉक्स प्रत (बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेचे असावे.) राष्ट्रीय बँकेचा खाते क्रमांक आयएफएससी कोडसह पासबुकची झेरॉक्स प्रत (बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक असणे आवश्यक आहे.) व आधार लिंक NPCL लिंक असणे अनिवार्य आहे.

➢ उत्पन्नाचा दाखला २०२५-२६ (मा. तहसीलदार यांचा २०२५-२६ दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत वैध) तसेच वडील हयात नसल्यास त्यांचा मृत्युचा दाखला व आईच्या नावाचा उत्पन्नाचा दाखला जोडावा.

➢ प्रवेश पावती झेरॉक्स (२०२५-२६)

तरी सदर विदयार्थ्यांनी वरील नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरताना आपले नाव आधारकार्ड वर ज्याप्रमाणे तसे नमूद करावे.

आधारकार्ड पर ज्याप्रमाणे आहे तसे नमूद करा तरी जर पात्र विदयार्थी सदर शिष्यवृत्तीपासून वंचीत राहिला तर जबाबदार राहणार नाही. याची सर्व विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

टीप -ऑनलाईन अर्ज भरण्यावेळी तांत्रिक स्वरुपाची अडचण येत असल्यास तसेच भारत सरकार सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती संदर्भात कोणत्याही स्वरुपाची शंका असल्यास आपण त्वरीत शिष्यवृत्ती विभागाशी संपर्क साधावा.

प्राचार्य
अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स व
हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज,

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner